**<u>ठळक बातम्या</u>**

- डिजिटल आर्थिक व्यवहारांमध्ये भारताला जागतिक पातळीवर अग्रणी करण्यात रिझर्व्ह बँकेची भूमिका महत्त्वाची असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- एक लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये बाइक टॅक्सीला परवानगी देण्याचा राज्य मंत्रीमंडळाचा निर्णय
- वक्फ सुधारणा विधेयक उद्या लोकसभेत मांडलं जाणार
- नव्या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी शेअर बाजारात मोठी घसरण

**आणि**

- साताऱ्यात गारपीट /मराठवाडा आणि उत्तर-मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**<><><><><>**

देशाच्या सर्व नागरिकांचा रिझर्व बँकेवरचा दृढ विश्वास ही मौलिक ठेव आहे, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९०व्या स्थापनादिन सोहळ्याच्या समारोप कार्यक्रमात त्या मुंबईत बोलत होत्या. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

होल्ड

डिजिटल व्यवहारांमध्ये भारताला जागतिक पातळीवर महत्त्वाचं स्थान मिळवून देण्यात आरबीआयनं महत्त्वपूर्ण भूमिका निभावली असल्याचं त्या म्हणाल्या,

**होल्ड… बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू…**

प्रचंड गरीबीपासून ते जगातल्या महत्त्वाच्या अर्थव्यवस्थांमधे स्थान मिळवणाऱ्या भारताचा संपूर्ण प्रवास रिझर्व्ह बँकेनं बघितला आहे. फसवणुकीच्या वाढत्या घटना, सायबर धोके याचा सामना रिझर्व्ह बँक तत्परतेनं करत असल्याचंही

राष्ट्रपतींनी नमूद केलं. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९०व्या वर्षपूर्तीनिमित्त विशेष 'माय स्टॅम्प'चं अनावरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते यावेळी झालं.

देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनं आगामी दशक अतिशय महत्त्वाचं असून आर्थिक समावेशन, ग्राहक सुरक्षा आणि आर्थिक प्रगतीसाठी भारतीय रिझर्व्ह बँक वचनबद्ध आहे, अशी ग्वाही गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी स्वागतपर संबोधनात दिली. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह इतर मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

<><><><><>

बाईक टॅक्सी वाहनांच्या समुच्चयक धोरणाला राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. त्यानुसार १ लाख लोकसंख्या असलेल्या सर्व शहरांमधे रमानाथ झा समितीच्या शिफारशी सुधारणेसह लागू करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला.

नोंदणीकृत वाहन निष्कासन केंद्रामध्ये स्वेच्छेनं निष्कासित केलेल्या वाहनांच्या अनुषंगानं सुधारित कर सवलत लागू करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळानं घेतला.

वडसा-देसाईगंज-गडचिरोली या रेल्वे मार्गासाठी १ हजार ८८६ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चाला मंत्रिमंडळानं मान्यता दिली. यापैकी ५० टक्के, म्हणजे ९४३ कोटी रुपये इतकी रक्कम राज्य सरकार देणार आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील प्रमुख खनिज आणि विशिष्ट औद्योगिक गौण खनिजाच्या व्यवस्थापनासाठी गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. त्यासाठीच्या प्रारूप अधिनियमाला आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

मार्वल, अर्थात महाराष्ट्र रिसर्च अँण्ड व्हिजीलन्स फॉर एनहान्स्ड लॉ एन्फोसर्मेंट लिमिटेडकडे कृत्रिम बुद्धिमत्ता वापराची कामं प्राधान्यानं देण्याचा निर्णयही या बैठकीत झाला.

**<><><><><>**

महाराष्ट्र हे कलासंपन्न राज्य आहे. त्यामुळे इथली नाट्यगृहं कशी असावीत तसंच कलाकार आणि प्रेक्षकांना काय सुविधा असाव्यात याविषयी सर्वंकष नाट्यगृह धोरण येत्या दोन महिन्यात तयार करण्यात येईल अशी घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी आज केली. वर्धा इथे छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहाच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी शेलार यांच्या हस्ते साडेआठ कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं भूमिपूजनही करण्यात आलं.

**<><><><><>**

देशात प्रत्येक ग्रामपंचायतीला वेगवान संपर्क यंत्रणा निर्माण करण्यासाठी भारत नेट प्रकल्प राबवण्यात येत आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात राज्याने दमदार कामगिरी केली असून दुसऱ्या टप्प्यात राज्यातल्या उर्वरित ग्रामपंचायतीपर्यंत संपर्क यंत्रणा प्रस्थापित करावी असे निर्देश केंद्रीय दूरसंवाद मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिले. मुंबईत सह्याद्री अतिथीगृह इथे झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

राज्यामध्ये गडचिरोलीसह दुर्गम आणि अतिदुर्गम भागात संपर्क यंत्रणा निर्माण करण्यासाठी राज्य शासन केंद्राला संपूर्ण सहकार्य करेल. टॉवर उभारण्यासाठी गडचिरोलीच्या अतिदुर्गम भागात संपूर्ण सुरक्षा दिली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी बैठकीदरम्यान सांगितलं.

**<><><><><>**

बीड जिल्हा कारागृहात शनिवारी कैद्यांमधे झालेल्या मारामारीच्या पार्श्वभूमीवर आठवले गँगच्या तिघांची नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहात आज रवानगी करण्यात आली. अक्षय आठवले, ओंकार सवई आणि मनीष क्षीरसागर अशी या कैद्यांची नावं आहेत. गीते गँगच्या चार जणाची रवानगी काल छत्रपती संभाजीनगरमधल्या हर्सुल तुरुंगात करण्यात आली होती.

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयक उद्या लोकसभेत मांडण्यात येणार आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्याकडे अल्पसंख्याक व्यवहार विभागाचाही कार्यभार असून ते उद्या सभागृहात हे विधेयक मांडतील. विधेयकावर ८ तासांची चर्चा घेण्यात येणार असल्याचं त्यांनी संसद भवन परिसरात प्रसारमाध्यमांना सांगितलं. सभागृहाला आवश्यक वाटल्यास चर्चेचा कालावधी वाढवण्यात येईल असं ते म्हणाले. विधेयकाबाबत कोणत्याही प्रश्नांची उत्तरं द्यायची सरकारची तयारी आहे, असं सांगून ते म्हणाले की विरोधी पक्षांना अनुनयाचं धोरण राबवायचं असल्याने ते या विधेयकाला विरोध करत आहेत.

दरम्यान वक्फ सुधारणा विधेयक उद्या मांडलं जाणार असल्याच्या पार्श्वभूमीवर पुढचे ३ दिवस लोकसभेत हजर राहण्याचा पक्षादेश भाजपाने आणि काँग्रेसनेही आपापल्या खासदारांना काढला आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भरमसाठ आयात शुल्क लादणार असल्याच्या शक्यतेनं नवीन आर्थिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी देशातल्या शेअर बाजारात मोठी घसरण झाली. सेन्सेक्स आज १ हजार ३९० अंकांनी घसरुन ७६ हजार २४ अंकांवर बंद झाला. निफ्टी ३५४ अंकांची घट नोंदवून २३

हजार १६६ अंकांवर स्थिरावला. तेल आणि नैसर्गिक वायू तसंच दूरसंचार क्षेत्र वगळता इतर सर्वच क्षेत्रातले समभाग आज घसरले. राज्यात रेडी रेकनर दर वाढल्याचा विपरीत परिणाम बांधकाम क्षेत्रातल्या कंपन्यांवर झाला.

**<><><><><>**

सातारा जिल्ह्यातल्या कराड तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारपीट सुरू असून उर्वरित भागात सोसाट्याचा वारा सुरू आहे.

जालना जिल्ह्यात आज काही ठिकाणी अवकाळी पावसानं हजेरी लावली. घनसावंगी तालुक्यातल्या अनेक गावांमधे जोरदार पाऊस झाला. यामुळे मका, गहू आणि हरभऱ्याचं मोठं नुकसान झालं आहे.

पालघर जिल्ह्यात कालपासून ढगाळ वातावरण होतं. जिल्ह्यातल्या काही भागात हलका पाऊस पडला.

**<><><><><>**

राज्यातल्या बहुतेक भागांमध्ये अवकाळी पावसाचा इशारा हवामानखात्यानं दिला आहे. जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, पुणे जिल्ह्यात घाटमाथा परिसर, छत्रपती संभाजीनगर, जालना, सातारा या जिल्ह्यांना हवामान विभागानं ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

येत्या दोन दिवसांसाठी ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी तसंच अकोला, अमरावती , बुलढाणा, कोल्हापूर, सांगली, बीड, लातूर, भंडारा, धाराशिव, नांदेड या जिल्ह्यांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. विदर्भातल्या सर्व जिल्ह्यांमधे अवकाळी पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

आयपीएलमधल्या सामन्यांवर सट्टा लावणाऱ्या आणखी सात संशयितांना जालना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. संशयित काल झालेल्या कोलकत्ता नाईट रायडर्स विरुध्द मुंबई इंडियन्स यांच्यातल्या सामन्यावर सट्टा लावत होते. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं जालना-छत्रपती संभाजीनगर मार्गावरच्या एका हॉटेलवर छापा टाकून ही कारवाई केली. संशयितांकडून मोबाईल, रोख रक्कम, इतर साहित्य असा एकूण ५३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनौ सुपर जायंट्सचा सामना पंजाब किंग्जबरोबर लखनौ इथं थोड्याच वेळात म्हणजे साडेसात वाजता सुरू होणार आहे. या सामन्यात पंजाबनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला.